नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०४/२०२६ (शनिवार )**

## मा. पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासाठी घेतली " सर्व कर्मचारी संवाद बैठक" ( All Hands Meet)

आज दिनांक २४/०४/२०२६ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिक्षक कार्यालय, तसेच पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन स्टाफ यांची **" सर्व कर्मचारी संवाद बैठक " (All Hands Meet) घेतली** . उपस्थित पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या अडीअडचणी, कामकाजासंदर्भातील विविध मुद्दे तसेच नवनविन कल्पना या विषयांवर चर्चा करण्यात आली. उपस्थितांनी मांडलेल्या समस्यांची तसेच उपाययोजनांची मा. पोलीस अधीक्षक यांनी दखल घेतली. संबंधिताच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याचे निर्देश दिले. सदर बैठकीत पोलीस दलातील विविध पदावरील अधिकारी/ अंमलदार यांच्या अनुभवाचा उपयोग करून पोलीस दलातील कामकाजात येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे, शिस्त व समन्वय राखणे याबाबत चर्चा करण्यात आली.

**सदर सर्व कर्मचारी संवाद बैठकीस श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण, श्रीमती पुजा गायकवाड, पोलीस उपअधिक्षक (आर्थीक गुन्हे शाखा), प्रभार पोलीस उपअधिक्षक (गृह) ,तसेच सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी, अंमलदार आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.**









## नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध अंमली पदार्थ ,अवैध हत्यारांच्या गुन्हयामधील सक्रीय तसेच वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या ३ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावला आहे

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी:– मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात एमआयडीसी बोरी पोलीसांनी वर्चस्व निर्माण करून दहशत माजविणाऱ्या आरोपीतांचा टोळी प्रमुख तसेच २ सदस्य अशा एकुण ३ आरोपीतांविरुद्ध **महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे.** सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे ०१) अभिनेष उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बरमे उर्फ वर्मा, वय २४ वर्ष, रा. येरला,ता. कळमेश्वर, जि. नागपूर हा असुन टोळी सदस्य ०२) विजय भिकूजी महाकाळकर , वय ३३ वर्ष, रा. राजीवनगर, वार्ड क्र. ०३ सरोदी मोहल्ला, कठीया भंडार जवळ हिंगणा रोड, नागपूर, ०३) जंगतसिंग अंगतसिंग दुधानी, वय ४१ वर्ष, रा. रायपूर, हिंगणा रोड, नागपूर हे आहेत.

दिनांक ०२/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पथकाने कारवाई करत आय २० कार क्रं एम एच ४६ ए पी ७७२६ या वाहनामध्ये आरोपी विजय भिक्कुजी महाकाळकर, वय ३३ वर्षे, रा वार्ड क्रं ६, राजीव नगर, वानाडोंगरी, हिंगणा रोड नागपुर याला १.११४ किलोग्रॅम अंमली पदार्थ गांजा आणि लोखंडी भरमार बंदुक या अग्निशस्त्रासह पकडले होते. पोलीसांनी सदर आरोपीची चौकशी केली असता गांजा पुरवाठा करणारा आरोपी अभिनेष उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बरमे उर्फ वर्मा हा असुन अग्निशस्त्र पुरवाठा करणारा आरोपी जंगतसिंग अंगतसिंग दुधानी यांची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.सदर प्रकरणी नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एन. डी. पी. एस. आणि शस्त्र अधिनियमा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली. सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला आहे.

नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख अभिनेष उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बरमे उर्फ वर्मा हा परिसरात त्यांचे टोळीची दहशत पसरविण्यासाठी टोळीच्या सदस्यांसह चोरी, प्राणघातक शस्त्र बाळगणे, दुखापत, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी, अवैध्यरित्या अंमली पदार्थाची विक्री करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतो. नमुद टोळीचा प्रमुख अभिनेष उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बरमे उर्फ वर्मा याचे वर पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, कळमेश्वर तसेच नागपुर शहर अंतर्गत हुडकेश्वर ,गिट्टीखदान येथे गंभीर गुन्हे दाखल आहे. टोळी प्रमुख आरोपी अभिनेष उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बरमे उर्फ वर्मा याने आपले टोळी मध्ये नव—नविन सदस्यांना घेवुन यापुर्वी सुध्दा नागपूर ग्रामीण आणि नागपुर शहर हद्दीतील विवीध पोलीस स्टेशनचे अंतर्गत गंभीर गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**एमआयडीसी बोरी पोलीसांनी नमुद ३ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक,**

नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (**MCOCA**) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.



आरोपी अभिनेष उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बरमे उर्फ वर्मा



आरोपी विजय भिक्कुजी महाकाळकर



आरोपी जंगतसिंग अंगतसिंग दुधानी

# नागपूर ग्रामीण पोलिसांनी वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या ५ आरोपीतांच्या आंतरराज्यीय टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावला आहे

पोलीस स्टेशन देवलापार :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात देवलापार पोलीसांनी वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या आंतरराज्यीय आरोपीतांचा टोळी प्रमुख आरोपी नामे १) दानिश अब्दुल गफुर आफ्रिदी, वय २५ वर्ष रा.घर क्र.२७ ,सुभाषचंद्र बोस वार्ड, न्यु आनंद नगर, रझा चौक, थाना. हनुमानताल, जबलपुर राज्य म.प्रदेश आणि ४ टोळी सदस्य अशा एकुण ५ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे.**

दिनांक ०४/०३/२०२६ रोजी देवलापार पोलीसांनी गोपनिय माहीती वरून चारचाकी वाहन क्रं एम पी २८ सी बी ३००८ यामध्ये दनिश अब्दुल गफुर आफ्रिदी याला त्याचे साथीदारांना **देशी बनावटीचे पिस्टल (माउजर) आणि २ जिवंत काडतुसांसह पकडले होते. नमुद प्रकरणी आरोपींविरूद्ध पोस्टे देवलापार येथे कलम ३/२५ शस्त्र अधिनियम सह कलम ३(५) भान्यासं,सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पोलीसांनी साखळी पुरावे जोडत गुन्हयाचा तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला आहे.**

नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख दानिश अब्दुल गफुर आफ्रिदी आणि त्याचे साथीदार यांची आतरराज्यीय टोळी असुन नमुद टोळी प्रमुख व टोळीतील सदस्य हे आर्थिक फायदयासाठी तसेच परिसरात त्यांचे टोळीची दहशत व वर्चस्व पसरविण्यासाठी स्वतंत्रपणे व एकत्रितपणे नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन देवलापार तसेच नागपूर शहर येथील पो. स्टे. कळमना, तहसिल तसेच मध्यप्रदेश राज्यातील पो.स्टे गोहलपुर, हनुमानताल, आधारताल, माढोताल, बेलबाघ व पनागर हद्दीत संघटीतपणे **खुनाचा प्रयत्न, प्राणघातक शस्त्र बाळगणे, गैरकायद्याची मंडळी जमविणे, गंभीर दुखापत, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी, अवैध्यरित्या अग्निशस्त्र/देशी पिस्टल ताब्यात बाळगुन विक्री करणे** यासारखे गुन्हे केले आहे. तसेच टोळी प्रमुखाने आपले टोळी मध्ये नव—नविन सदस्यांना घेवुन यापुर्वी सुध्दा अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण

ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्याचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**देवलापार पोलीसांनी नमुद ५ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**




**आरोपी दानिश अब्दुल गफुर आफ्रिदी**

# बनावट परवाना तयार करून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ६१ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त, २ आरोपी अटक

## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापुर :– दिनांक २४/०४/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, पवनी परिसरातुन टिप्परने अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक होत आहे त्या टिप्परला एक इसम क्रेटा वाहनाने स्कॉटींग करित आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा भिवापुर हद्दीतील कारगाव रेल्वे परिसरात नाकाबंदी केली असता भिवापुर रोड कडून हुडांई क्रेटा क्रं एम एच ४९ सी डी ४५७७ व त्यामागे एक भारत बेंझ कंपनीचा पिवळ्या रंगाचा १२ चक्का टिप्पर एम एच ४९ बी झेड १७१७ येतांना दिसला. सदर दोन्ही वाहन चालकास पोलीसांनी वाहन थांबविन्याचा ईशारा केला असता सदर वाहन चालकाने वाहन थांबविले. टिप्पर वाहन चालक आरोपी क्रं **१) कैसर अली रियाजउद्दीन अली,वय ४७ वर्षे, रा गरीब नवाज चौक, खरबी नागपुर** असे सांगीतले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती दिसुन आली.वाहन चालका कडील रेती वाहतुकीच्या परवान्याबाबत खात्री केली असता सदरचा परवाना बनावट असल्याचे आढळुन आले. चालकास अधिक विचारपुस केली असता मालक आरोपी क्रं **२) अजीज शेख रा. खरबी नागपुर** याचे सांगणेवरून बनावट परवान्यासह अवैधरित्या रेती वाहतुक करीत असल्याबाबत सांगितले. रेती टिप्परला स्कॉटींग करणारी हुडई क्रेटा क्र एम एच ४९ सीडी ४५७७ चा चालक आरोपी क्रं **३) मोहम्मद ईनाजुल उर्फ कल्लू खान, वय ३८ वर्षे, रा. रोशन बाग, खरबी ,नागपुर** असे असल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) भारत बेंझ कंपनीचा १२ चक्का टिप्पर एम एच ४९ बी झेड १७१७ किंमती ५०,००,०००/– रूपये, २) वाहनातील ९ ब्रास रेती किंमती ४५,०००/– रूपये, ३) एक हुडई क्रेटा क्र एम एच ४९ सीडी ४५७७ किंमती १०,००,०००/– रूपये, आणि ४) तीन अॅड्रॉईड फोन असा एकुण किंमती ६१,४५,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद तिन्ही आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२),३१८(४), ३३६(३),४९,३(५) भा.न्या.सं**

**सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये, सहकलम १५ पर्या संरक्षण अधी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टिप्पर आणि क्रेटा वाहन चालक यांना अटक करण्यात आली आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण येथे घेण्यात आले. आपत्ती प्रतिसाद किट हाताळणी प्रशिक्षण

दिनांक २२/०४/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन व पोलीस चौक्यांसाठी शासनामार्फत आपत्ती व्यवस्थापन किट (संच) उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या किटमधील साहित्यांचा आपत्कालीन परिस्थितीत प्रभावी वापर करता यावा, यासाठी पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण येथे मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण

जिल्हा यांचे मार्गदर्शनात “आपत्ती प्रतिसाद किट (संच) साहित्य हाताळणी” या विषयावर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यशाळा “बहुउद्देशीय सभागृह, पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण” येथे पार पडली. आपत्ती व्यवस्थापन किटमध्ये स्ट्रेचर, नेट, लाईफ जॅकेट, प्रथमोपचार पेटी, मॅन्युअल सक्शन पंप, अँबू बॅग (श्वास देण्यासाठी), मेडिकल लाईट पेन, चारकोल पावडर, रेस्क्यू सर्च लॅम्प, मेटल कटर, हेल्मेट इत्यादी साहित्याबाबत सविस्तर माहीती देवुन त्यांच्या वापाराबाबत प्रात्यक्षीत करून दाखविण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युनिव्हर्सिटी नागपुर चे डॉ. पायल चामटकर, श्री. अजहर अली आणि  श्री. मोहित सिद्धीकी यांनी आपत्ती प्रतिसाद किट (संच) साहित्याचा वापर पूरस्थिती, आग लागल्यास, महामारीच्या काळात तसेच मोठे अपघात झाल्यास कसा करावा याबाबत सविस्तर प्रशिक्षण देवुन मार्गदर्शन केले.

**नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन आणि शाखेतील २४ आधिकारी आणि  १०४ अंमलदार यांना हे प्रशिक्षण देण्यात आले आहे.**





## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ४ गोवंश जनावरांची सुटका, रामटेक पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २३/०४/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्तबातमीदाराने माहीती दिली की, रामटेक ते आमडी रोडने गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे .मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी आमडी गावात नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक पिकअप वाहन क्रमांक एमएच ४० डीसी ३१८० हे मिळुन आले. वाहन चालक आरोपी क्रं १) नामे कैलास गणपतजी वाघ, वय २५ वर्षे, आणि वाहन मालक आरोपी क्रं २) दिनेश प्रमोद पांडे, वय २१ वर्षे, दोघे रा. सावंगी ता. सावनेर जि नागपुर हे वाहनात मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ४ गोवंश जनावरे ( बैल ) मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही

चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयीतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून पिकअप वाहन क्रमांक एमएच ४० डीसी ३१८० किंमती ३,००,००० /—रूपये आणि ४ गोवंश जनावरे ( बैल ) किंमती ७०,००० /—रूपये असा एकुण ३,७०,००० /—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नुमद प्रकरणी आरोपीतांविरूध्द कलम ११(१), ११(१) (डी,) ११(१) (एफ),प्राण्याचा छळ प्रतिबंधक अधिनीयम १९६०,अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ९ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये,गुन्हे नोंद

दिनांक २३/०४/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन रामटेक** :— रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १) मनोहर ब्रम्हदेव सदा, वय ३५ वर्षे, रा. मनसर, ता. रामटेक आणि आरोपी क्रं २) बलराम सुखराम बौमचेर वय ५७ वर्शे रा खंडाळा डुमरी ता पारशिवनी हे बस स्टॉप रामटेक च्या मागे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** बुटीबोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १) विशाल हरिभाऊ डोंगरे, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं. १, हनुमान मंदीराजवळ, हमदापूर ता. सेलू जि. वर्धा ह.मु. ताज मंदीर जवळ,जुनी वस्ती, बुटीबोरी ,आरोपी क्रं २) राज बाबुलाल कुमरे ,वय २३ वर्ष, रा. राणी दुर्गावती बैंक जवळ, रुईखैरी ता.जि. नागपुर आणि क्रं ३) राकेश इंद्रजित गौतम वय ४५ वर्ष रा. जुनी बस्ती, बुटीबोरी ता.जि. नागपुर हे बुटीबोरी ते चंद्रपुर रोडवरील रुईखैरी शिवारातील वाय पॉईंट जवळील पुलाखालील सार्वजनीक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी** :— एमआयडीसी बोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी संदिप कुमार हेमलाल विश्वकर्मा, वय २९ वर्षे, रा. चुली ता चोराहट जि सिधि ह.मु टेभरी, हा टेभरी सनविजय कंपनी येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना कुणाल नरेश राउत, वय २६ वर्ष, खदान नं ०६ पाणीटंकी जवळ, टेकाडी कन्हान हा मौजा खदान नं ०६ येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

**पोलीस स्टेशन सावनेर :—** सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १) लक्ष्मण भगवान सेवके, वय ५५ वर्षे, रा. पोळा मैदान वार्ड क्र १४ सावनेर जि नागपूर हा पोळा मैदान वार्ड क्र १४ येथील नदीचे मागील खाली जागेत आणि आरोपी क्रं २) जगदिश लखनलाल चिन्नोरकर, वय ६४ वर्ष, रा वार्ड क्र ०७, जिवतोडे हॉस्पीटल चे समोर महेश्वरी ले आउट सावनेर हे नगर परिषद सावनेर चे खुले मैदान येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण ९ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ९ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**